ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

**Maharashtra Political Science and Public Administration Conference**
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 4 No. : 2 Issue - 11 May-Aug.2017 ISSN No. :2347-9639

# VICHAR MANTHAN

34 Years

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## Reservation : Movements and Reality




महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

## आरक्षण : आंदोलने व वास्तवता

अथर्व पब्लिकेशन्स

मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक - डॉ. प्रमोद पवार । डॉ. मनोहर पाटील

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

34 Year's

Maharashtra Political Science & Public Adminstration Conference Research Journal

# VICHAR MANTHAN

## National Research Journal of Political Science and Public Administration

(A Peer Reviewed Journal)

Vol. - 4 , No - 2, Issue - 11 May-Aug. 2017 ISSN- 2347-9639

♦ Chief Editor / President ♦

**Prin. Dr. P. D. Deore**

11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc., Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13 Mob : 9423980457

♦ Editor ♦

**Prin. Dr. Pramod Pawar**

Dhandai Arts College, Amalner Dist. Jalgaon

Email- pramodpawar1761@gmail.com Mob:9423582073

♦ Editor / Secretary ♦

**Prin. Dr. Manohar Patil**

S.S.V.P.S College, Dhule

Email-manoharpatil123@gmail.com Mob:9422287053

♦ Hon'ble Guest Editiors ♦

**Dr. Sushama Yadav** (New Delhi)
**Dr. Sanjeevkumar Sharma** (Meerut)
**Dr. Subhash Chandrakar** (Raipur)
**Dr. Shilpi Bose** (Raipur)
**Dr. Anita Deshpande** (Bhopal)
**Dr. Garima Jawualkar** (Bhopal)
**Dr. Sunilkumar Goyal** (Khandwa)
**Dr. Ketan Govekar** (Panji, Goa)
**Dr. J. Prabhash** (Kerala)
**Dr. Shaikh Abul Barkat** (Hydrabad)

♦ Editing Assists ♦

**Dr. Sambhaji Patil** (Shindkheda)
**Asst. Prof. Gautam Bhalerao** (Jalgaon)
**Asst. Prof. Viqar Shaikh** (Jalgaon)
**Asst. Prof. Sanjay Patil** (Chopada)

♦ Advisory Editors ♦

**Dr. Vitthal More** (Latur)
**Dr. Vasanti Rasam** (Kohlapur)
**Dr. Bharati Patil** (Kolhapur)
**Dr. Surendra Jondhale** (Mumbai)
**Dr. Alka Deshmukh** (Nagpur)
**Dr. Mohan Kashikar** (Nagpur)
**Dr. Prakash Pawar** (Kohlapur)
**Dr. Rajeshwari Deshpande** (Pune)
**Dr. Bal Kamble** (Karjat-Pune)
**Dr. Ashok Naikwade** (Aurangabad)
**Dr. Balasaheb Bhosale** (Tasgaon)
**Dr. Pyarelal Suryawanshi** (Amravati)
**Dr. Jyostna Sonkhaskar** (Sinnar)
**Dr. Suresh Bhalerao** (Parbhani)
**Dr. Sanjay Gore** (Gadchiroli)
**Dr. Sanjay Wagh** (Mumbai)

♦ Managing Editor ♦

Mr. Yuvraj Mali

♦ Publishers ♦

**Atharva Publications**

Basement, Om Hospital, Near Anglo Urdu Highschool, Dhake Colony, Jalgaon - 425001 Ph.No. 0257-2239666

**Maharashtra Political Science and Public Administration Conference**

Reg. No. MAH/12-83/ Aurangabad-F-985

**Visit Us : www.vicharmanthanjournal.com** **E-Mail : vicharmanthanjournal@gmail.com**

**Subscription**

**Individuals : Rs. 1000/-** For Five Years **Institutions : Rs. 1500/-** For Five Years Singal Issue Price Rs.100/

विचारमंथन या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक आणि सल्लागार मंडळ यांना मान्य असतीलच असे नाही. या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखातील लेखकाची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या-त्या लेखकांवर राहिल.

मेसर्स अथर्व पब्लिकेशन्सच्या वतीने कार्यकारी संपादक श्री. युवराज माळी यांनी प्लॉट न. १७, देविदास कॉलनी, धुळे-४२४ ००१. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व आविष्कार प्रिंटर्स, अयोध्यानगर, जळगाव येथे मुद्रित केले. मोबाईल : ९४०५२०६२३०, फोन : ०२५७-२२३९६६६.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# * अनुक्रमणिका *


- **Reservation Issue of Minority Communities in India** ........ ०७
  - Dr. Vidya S. Raut, Akola
- **Social Justice & Reservation in India** ........ १०
  - Dr. Shriniwas Bhong, Sangamner
- **Muslim Reservation is Vote Bank Politics** ........ १२
  - Prin Dr. Pramod Pawar
  - Prof.Vaqar R.Shaikh, Jalgaon
- **Globalisation and Affirmative Action in India** ........ १४
  - Dr Vaibhav R Suryawanshi, Bhor, Dist –Pune
- **Indian Federalism -Claims for New States** ........ १७
  - Dr. Kanti Kiran David, Khandwa (M.P)
- **आरक्षण आंदोलन एक अवलोकन** ........ २०
  - डॉ. महिमा बाजपेयी, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण आन्दोलन का इतिहास एक दृष्टिकोन** ........ २२
  - डॉ. सुनीता कविश्वर, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण आंदोलन हरियाणा के विशेष संदर्भ में** ........ २४
  - डॉ कृष्णा सोलंकी, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण आंदोलन एक समीक्षा (पाटीदार आंदोलनों के विशेष संदर्भ)** ........ २६
  - डॉ.एस.के.गोयल, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण एवं ऐतिहासिक अवलोकन** ........ २९
  - डॉ. अर्चना पाटिल, सावनेर, महाराष्ट्र
- **आरक्षण** ........ ३२
  - प्रा. सरला वसंतराव मेश्राम, उमरेड
- **मराठा क्रांती मोर्चे : एक चिंतन** ........ ३५
  - डॉ. व्ही.एल. एरंडे, निलंगा
- **आरक्षण आणि वास्तवता** ........ ४१
  - प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, कर्जत,
  - प्रा. प्रदीप जगताप, कर्जत
- **भारतीय संविधान आणि मराठा आरक्षण** ........ ४३
  - प्रा. डॉ. आर. जी. मुरळकर, मेहकर
- **अनुसूचित जमातीचे राजकीय आरक्षण (विशेष संदर्भ – नंदुरबार जिल्हा )** ........ ४७
  - प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, अमळनेर
  - धनराज पाटील, नंदुरबार
- **प्रतिनिधीत्वाचा मुद्दा : महिला आरक्षण** ........ ५१
  - माधव चोले, देगलूर, जि.नांदेड.

- मराठा आरक्षणाची मागणी : वास्तव आणि विपर्यास ........................ ५५
  - डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले, निलंगा
- अनुसूचित जमाती आरक्षण घटनात्मक तरतूदी ........................ ६०
  - प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, अमळनेर
  - प्रा.गौतम भालेराव, जळगाव
- मराठा आरक्षण आणि मोर्चाचे स्वरूप ........................ ६२
  - प्रा.डॉ.विनोद गायकवाड, शेगांव
- महाराष्ट्रातील आरक्षण व आंदोलनांची वास्तविकता ........................ ६६
  - प्रा.डॉ.सुरेंद्र अंबर मोरे, धुळे
- भारतातील आरक्षणविषयक तरतुदींची वास्तवता ........................ ६९
  - डॉ. शुभांगी राठी, भुसावळ
- आरक्षण आणि जातीय अस्मितेचे राजकारण ........................ ७२
  - प्रा.किरण नामदेव गायकवाड, पैठण
- आरक्षण : घटनात्मक तरतुदी ........................ ७५
  - डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड, अकोला
- आरक्षण : आंदोलने व वास्तवता ........................ ८०
  - प्रा.डॉ.सुरेंद्र अंबर मोरे, धुळे
  - प्रा. विनय खेमा वाघ, दोंडाईचा
- भारतीय संसद व राज्यीय विधीमंडळामधील महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीचे अध्ययन .... ८३
  - प्रा.जयेश पाडवी, जळगाव
  - छोटू नकुल मावची, जळगाव
- महाराष्ट्रातील आरक्षण चळवळी : अपेक्षा व वास्तव ........................ ८७
  - डॉ. विजय साहेबराव तुंटे, अमळनेर
  - श्री. हर्ष अरुण नेतकर, अमळनेर
- आरक्षण – आंदोलने आणि वास्तव ........................ ९१
  - प्रा. डॉ. सौ. मेघा संजय पाटील, इस्लामपूर
- आरक्षण : आंदोलने आणि वास्तविकता ........................ ९५
  - प्रा. डॉ. संदीप भि. काळे, सेलू जि. वर्धा
- महिला राखीव जागा – वास्तव ........................ ९९
  - प्रा. डॉ. मनिषा अनिल कचवे, धुळे
- पंचायत राज एक चिकित्सक अभ्यास ........................ १०२
  - प्रा. डॉ. सुनंदा वामनराव ठाकरे, धुळे
  - राखी रविंद्र घरटे
- बहुराष्ट्रीय कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय राजकारण ........................ १०६
  - प्रा. डॉ. रतन व्ही. राठोड, अकोला
- भारतीय धर्मनिरपेक्षता आणि सांप्रदायिकता ........................ १०८
  - प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबूराव, देगलूर
- बहुसंस्कृतिवाद संकल्पना आणि तिच्या विकास प्रक्रियेचा अभ्यास ........................ ११५
  - प्रा. डॉ. महेंद्र पाटील, शिरपूर


ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# प्रतिनिधीत्वाचा मुद्दा : महिला आरक्षण

- माधव चोले
देगलूर, जि.नांदेड.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विधिमंडळातील महिला आरक्षण विधेयक का संमत होत नाही, त्याच्या अडचणी, महिला आरक्षण विधेयकाचे मुख्य मुद्दे, त्यावर राजकीय पक्षांच्या भूमिका, महिलांचे समाजातील स्थान, राजकारणातील सहभागाचे स्थान, संविधानातील दुर्बलांसाठीच्या तरतुदी याचा अभ्यास खालीलप्रमाणे केलेला आहे.

सर्व विश्वात प्राचीन काळापासून आजतागायत स्त्रीयांना पुरूषांच्या तुलनेत सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकारणात दुय्यम स्थान दिलेले आहे. भारतात रामायण आणि महाभारतकालीन समाजात आणि आजही पुरूषांनी स्त्रीयांना दुय्यम स्थान देऊन उपभोगाची वस्तु बनविलेली आहे.

**लिंगावर आधारित भेदभाव :-**

धर्म आणि लिंग - पती हा ईश्वर असतो. स्त्री ही अबला असते. स्त्रीयांना पुरूष सहारा देतात. पुरूष आणि लिंग -पतीची दासी, आई, पत्नी, बहिण, मुलींच्या रूपात. महिला आणि लिंग - सासू, सून, नणंद अर्थात स्त्रीच, स्त्रीचे शोषण करते. कुटुंब नियोजन आणि लिंग- कुटुंब नियोजन महिलांनीच करावे, त्यात तांबी, गर्भपात, गोळ्या इत्यादी.

**राजकारण आणि महिला :-**

महिलांची उन्नती व विकास होण्यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तिच्या क्षमतेनुसार विकास करण्याची संधी देणे आवश्यक आहे. विशेषतः राजकीय सहभाग वाढवून सशक्तीकरण करणे आवश्यक आहे.

स्त्री-पुरूषात समानता, स्त्रीयांना स्वतःच्या क्षमतेनुसार पूर्ण विकास करण्याचा अधिकार, स्वतःसंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार देण्यासाठी राजकीय सहभाग वाढविणे आवश्यक आहे. महिलांच्या आंदोलनामुळे काही प्रश्न सुटलेले आहेत, प्रण तिला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वंचितच राहावे लागले आहे.

संविधानाने स्त्री-पुरुषांना समान राजकीय अधिकार देऊनही व्यवहारात महिलांची राजकीय हिस्सेदारी फारच कमी आहे, संसद आणि राज्यांच्या विधिमंडळात पुरूषांच्या तुलनेत प्रतिनिधीत्व कमी आहे. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत ५५६ महिला उमेदवारांपैकी फक्त ५९ महिला विजयी झाल्या होत्या. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत ४५ तर १९९६ मध्ये ५६ महिला विजयी झाल्या होत्या. १६ व्या २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ६३१ महिला उमेदवार उभा ठाकल्या त्यापैकी ६२ विजयी झाल्या. महिलांची लोकसभेतील टक्केवारी ११% आहे.

महिलांच्या राजकीय सहभागातील बाधा महिलांची सामाजिक स्थिती- महिलांचे कार्य चूल आणि मूल तसेच संविधानात्मक समानतेची संधी मिळाली तरी तिच्यावर दुहेरी कामाची जबाबदारी, घरकाम आणि बाहेरचे तसेच राजकीय स्थिती यात सध्याच्या निवडणुका ह्या अत्याधिक पैसा आणि बळांचा वापर यावर होतात आणि हे पुरूषच करू शकतात. महिलांना हे जिकिरीचे आहे, राजकीय पक्षांची सूत्रेही पुरूषांकडेच आहेत. इत्यादी.

**संविधानात्मक दुर्लबलांसाठी तरतुदी :-**

संविधानकारांनी सामाजिकदृष्ट्या वंचित व आर्थिकदृष्ट्या शोषितांचे हित साधण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी संविधानात तरतुदी केलेल्या आहेत.

अनुच्छेद १५ (४) नुसार शासन सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या अनुसूचित जाती, जमाती तसेच मागास प्रवर्गासाठी विशेष तरतुदी केलेल्या आहेत.

अनुच्छेद १६ (४) नुसार शासनाला असे वाटले की, मागासवर्गांना प्रशासनात पुरेसे प्रतिनिधीत्व नाही तर अशा गटांना राखीव जागांचे प्रावधान केलेले आहे.

अनुच्छेद ४६ नुसार दुर्बल घटकांना म्हणजे मागासलेल्या गटांना, नोकऱ्या, प्रशासनात विशेष संधी देण्यात याव्यात.

अनुच्छेद ३८ (२) नुसार शासन आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यासाठी मागासांना पक्षपाती सोयी सुविधा देऊ शकते.

संविधानात अनुसूचित जाती, जमाती कोणत्या आहेत, याची नोंद केलेली नाही. प्रत्येक घटक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये कोणत्या जाती, जमाती या वर्गवारित येऊ शकतात, हे ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. त्यामुळे प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित, प्रदेशातील अनु.जाती, जमाती भिन्न आहेत. राज्यांच्या संदर्भात संबंधित राज्यपालांशी चर्चा करून राष्ट्रपती अधिसूचना जारी करतात.

अनुच्छेद ३३० नुसार अनुसूचित जाती, जमातींना लोकसभेत लोकसंख्येनुसार आरक्षित जागा असतील, तर अनुच्छेद ३३२ नुसार राज्यातील विधानसभेत अनु.जाती जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असेल, सुरुवातीला हे आरक्षण १० वर्षांसाठी ठेवण्यात आले होते, परंतु १९६० सालापासून सातत्याने हे आरक्षण १० वर्षांसाठी वाढविण्यात आले. सध्या ९५ व्या, १०९ व्या घटना दुरूस्ती विधेयकाने हे आरक्षण २०१० ते २०२० कालावधीसाठी वाढविण्यात आले.

अनुच्छेद १६४ (१) नुसार प्रत्येक राज्याच्या मंत्रिपरिषदेमध्ये अनुसूचित जाती, जमाती, मागासांच्या विकासासाठी एक मंत्री असेल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. उदा. मध्य प्रदेश, ओरिसा, झारखंड व छत्तीसगड या राज्यात ९४ वी घटनादुरूस्ती २००६ नुसार अनुसूचित जाती, जमाती मागासवर्गीयांच्या कल्याणाची विशेष जबाबदारी सोपविली आहे.

अनुच्छेद ३३८ नुसार राष्ट्रपती अनुसूचित जाती, जमातींच्या लोकांना विशेष संरक्षणाचा उपाय म्हणून तसेच त्यांच्या स्थितीची चौकशी

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

करून माहिती देण्यासाठी एका विशेषाधिकाऱ्यांची नियुक्ती करतो. अनुसूचित जाती-जमातींच्या रक्षणासाठी एक बहुउद्देशीय समिती २१ जुलै १९७८ मध्ये अस्तित्वात आली, त्यानंतर अनुसूचित जाती, जमाती आयोग म्हटले जाऊ लागले. १९८७ मध्ये नाव बदलून राष्ट्रीय अनुसूचित जाती, जमाती आयोग करण्यात आले. १९९० ला ६५ व्या संविधान संशोधनाने ३३८ व्या कलमात अनुसूचित जाती, जमाती यांना दिलेले अधिकार आणि सुरक्षात्मक उपाय यांच्या चौकशीचे अधिकार आहेत, याचे स्पष्टीकरण करण्यात आले.

अनुच्छेद २७२ (१) नुसार राज्यातील अनुसूचित जाती, जमातीच्या प्रदेशांना त्याचप्रमाणे कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन आर्थिक अनुदान देईल.

**मागासवर्ग :-**

मागासवर्ग ठरविण्यासाठी पहिल्यांदा १९५३ साली काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिला मागासवर्गीय आयोग स्थापन करण्यात आला. मागासवर्गीयांचे निकष ठरविण्यावरून सदस्यांमध्ये वादविवाद झाल्याने शिफारशींची अंमलबजावणी झालेली नाही. १९७९ ला बी.पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग नेमण्यात आला. व्ही.पी. सिंग सरकारने या आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या. ओ.बी.सि ना सरकारी नोकऱ्यात २७% आरक्षण देण्यात आले. १९९३ मध्ये राष्ट्रीय मागासवर्ग अधिनियम संमत करण्यात आला. त्यानुसार अनुच्छेद ३४० नुसार मागासवर्गाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोग निर्माण करण्यात आला.

**अल्पसंख्याकांसाठी :-**

संविधानात धार्मिक, भाषिक, अल्पसंख्याकांचा उल्लेख आहे. संविधानात अल्पसंख्याकांची व्याख्या दिलेली नाही. केंद्र शासनाने मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, बौध्द आणि झोरास्ट्रीन्स या पाच समुदायांना धार्मिक अल्पसंख्यांक म्हणून सूचित केलेले आहे.

अनुच्छेद २९ नुसार अल्पसंख्याकांना आपआपली भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा हक्क आहे. तसेच अनुदान प्राप्त शिक्षण संस्थांमध्ये धर्म, भाषा, जात, या आधारे भेदभाव करता येत नाही.

अनुच्छेद ३० नुसार धार्मिक, भाषिक, अशा अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा, चालविण्याचा हक्क आहे. अशांनाही अनुदान देता येते, याबाबतीत भेदभाव नाही.

**आंग्ल भारतीय समाजासाठी :-**

संविधानाने आंग्ल भारतीय समुदायाचा अर्थ निश्चित केलेला नाही, आंग्ल व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती जिचे वडील किंवा तिच्या पूर्वजातील कोणतीही पुरूष व्यक्ती, पश्चिमातील कुळातील आहे, ती भारतीय अधिवासी आहे, तिचा जन्म तिच्या पालकाच्या प्रदेशात झाला आहे ती व्यक्ती होय.

अनुच्छेद ३३१ नुसार लोकसभेत राष्ट्रपती दोन अँग्लो भारतीय समुदायांच्या प्रतिनिधींना नियुक्त करू शकतात.

अनुच्छेद ३३३ नुसार राज्यांच्या विधानसभेत राज्यपाल दोन अँग्लो भारतीय समुदायांच्या प्रतिनिधींची नेमणूक करू शकतो. हे आरक्षण ९५ मध्ये १०९ व्या घटनादुरुस्ती विधेयकाने २०१०-२० पर्यंत वाढविले आहे.

**पंचायती राज आणि महिला आरक्षण :-**

७३, ७४ वे संविधान संशोधन (१९९३) करून संविधानात ९ व्या भागात कलम २४३ समाविष्ट करण्यात आले तसेच ११ वे परिशिष्ट २९ बाबी राज्यशासनाने पंचायती राजसंस्थेकडे हस्तांतरित करण्यात आल्या.

अनुच्छेद २४३ (१) नुसार अनु.जाती,जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा असलेल्या पैकीच १/३ जागा त्या गटातील महिलांनाच आरक्षित असतील. तिन्ही स्तरावर एकूण निर्वाचित जागांपैकी १/३ जागा महिलांसाठी आरक्षित असतील, राखीव जागा असणारे मतदारसंघ चक्राकार पध्दतीने निर्धारित करण्यात येतील.

त्याचप्रमाणे तिन्ही स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या जागांमध्ये अनु.जाती, जमाती व महिलांसाठी १/३ अधिकारपदे राखीव असतील ही राखीव पदे चक्राकार पध्दतीने निर्धारित केली जातील.

महिला आरक्षणामुळे ग्रामीण आणि नागरी भागात महिलांचा राजकिय सहभाग वाढला आहे. सुशिक्षित शहरी स्त्रिया तर आत्मविश्वासाने स्थानिक स्वराज्यात वावरू लागल्या आहेत, तसेच निरक्षर स्त्रीयांही आपआपल्या प्रश्नावर निर्भिडपणे रस्त्यावर उतरत आहेत. या आरक्षणामुळे स्त्रीया स्थानिक राजकारणात सक्रिय झालेल्या आहेत.

**महिला आरक्षण विधेयक :-**

सुरुवातीला स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात १९१७ मध्ये सरोजिनी नायडूने महिलांच्या राजकीय प्रतिनिधीत्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी या मागणीचा अर्थ प्रौढ, समान अधिकारासंबंधी होता. १९३५ च्या सुधारणा अधिनियमाने हा अधिकार महिलांना प्रदान केला, परंतु हा अधिकार संपन्न व शिक्षित महिलांनाच होता.

महिलांची स्थिती सुधारण्यासाठी निर्माण केलेल्या समितीने १९७४ मध्ये आपल्या अहवालात महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (नागरी व ग्रामीण) आरक्षण द्यावे, त्याच समितीतील दोन सदस्यांनी विधिमंडळात आरक्षणाची मागणी केली. १९८८ च्या नॅशनल प्रस्पेक्टिव प्लानमध्ये ग्रामीण नागरी स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय पक्षांमध्ये ३०% आरक्षणाची शिफारस केली होती.

**महिला आरक्षणाचे मुख्य मुद्दे :-**

१. लोकसभा आणि राज्यविधानसभेत महिलांना ३३% आरक्षण असेल हे आरक्षण संसदेद्वारे निर्मित संस्थेद्वारे निर्धारण केले जाईल.
२. लोकसभा आणि राज्य विधानसभेत लोकसंख्येच्या प्रमाणात जे आरक्षण अनुसूचित जाती, जमातींना आहे त्यातच त्याच जातीच्या महिलांना १/३ आरक्षण असेल.
३. सर्व महिलांना समान आरक्षण असेल, अनुसूचित जाती, जमातींना स्वतंत्र आरक्षण नाही.
४. महिला आरक्षण लागू झाल्यानंतर १५ वर्षांनी त्याची समीक्षा केली जाईल.
५. राज्यसभा आणि विधानपरिषदेसाठी स्वतंत्र आरक्षणाच्या प्रावधानाची आवश्यकता.

**लोकसभा :-**

लोकसभेत महिला आरक्षित जागा धोरण विभिन्न राज्ये, केंद्रशासित प्रदेशात रोटेशन प्रणालीनुसार केले जाईल. ज्या केंद्रशासित अथवा राज्यात लोकसभेची एकच जागा आहे. तेथे तीन निवडणुकांच्या पहिल्या निवडणुकीत महिलांना आरक्षण असेल. हाच नियम अनुसुचित जाती, जमातींनाही असेल.

**विधानसभा :-**

१. सर्व राज्यातील विधानसभेत एकूण सदस्यांच्या १/३ संख्या ही महिलांसाठी आरक्षित असेल. आरक्षित जागा रोटेशन पध्दतीने निर्धारीत केली जाईल.
२. अनुसूचित जाती-जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असेल त्यातीलच १/३ जागा अनुसूचित जाती, जमातींना असतील (लोकसभेप्रमाणेच)

**महिला आरक्षणाचा घटनाक्रम :-**

**१२ सप्टेंबर १९९६ :-**

एच.डी. देवेगौडा सरकारने महिला आरक्षण विधेयकाला ८१ व्या संविधान संशोधन विधेयकाच्या रूपात संसदेत मांडण्यात आले, परंतु काही दिवसातच देवेगौडा सरकार अल्पमतात आले. त्यामुळे ११ वी लोकसभा भंग करण्यात आली.

**१४ डिसेंबर १९९८ :-**

भाजपाच्या रालोआ सरकारने महिला आरक्षण विधेयकाला १२ व्या लोकसभेत ८४ व्या संविधान संशोधनाच्या रुपात प्रस्तुत करण्यात आले. यावेळी पण वाजपेयी सरकार अल्पमतात आल्याने १२ वी लोकसभा भंग करण्यात आली. त्यामुळे बिल संमत होऊ शकले नाही.

**२२ नाव्हेंबर १९९९ :-**

दुसऱ्यांदा रालोआ सरकार तर्फे १३ व्या लोकसभेत महिला आरक्षण विधेयक मांडण्यात आले. पण सहमती अभावी हे विधेयक संमत झाले नाही. २००२ आणि २००३ मध्ये परत महिला आरक्षण प्रस्तुत करण्यात आले. याला कॉंग्रेस आणि डाव्यांनी पाठिंबा दिला पण तरीसुध्दा हे विधेयक संमत झाले नाही.

**मे २००४ :-**

मध्ये कॉंग्रेसच्या संपुआने त्यांच्या जाहीरनाम्यात महिला आरक्षण विधेयक संमत करण्याचे ठरविले.

**६ मे २००८ :-**

हे विधेयक राज्यसभेत मांडण्यात आले कायदा आणि न्यायासंबंधी स्थायी समितीकडे पाठविण्यात आले.

**१७ डिसेंबर २००९ :-**

स्थायी समितीने परत हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात आले पण समाजवादी पार्टी, जनतादल युनायटेड आणि राष्ट्रीय जनता दलाच्या विरोधामुळे हे विधेयक मंजूर झाले नाही.

**२२ फेब्रुवारी २०१० :-**

राष्ट्रपती प्रतिभाताई आपल्या संसदेच्या अभिभाषणात सांगितले, सरकार महिला आरक्षणाला लवकर संमती देईल. २५ फेब्रुवारी २०१० ला केंद्रीय मंत्रीमंडळाने महिला आरक्षणाला अनुमोदन दिले. ०८ मार्च २०१० ला बिल राज्यसभेत मांडण्यात आले पण सभागृहात राजद, सपाने हंगामा निर्माण केल्याने मतदान झाले नाही, ९ मार्च २०१० ला राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक बहुमताने संमत झाले.

**आरक्षण विधेयकातील प्रमुख वादाचे मुद्दे :-**

महिला आरक्षण विधेयक राजकीय पक्षांमध्ये एकमत होण्याच्या अभावी आतापर्यंत पास झालेले नाही. आघाडी शासनातील विभिन्न पक्षांच्या मतभेदाच्या भूमिकेमुळे हे विधेयक संमत झालेले नाही.

१. समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, बहुजन समाजवादी पार्टी, संयूक्त जनता दल, लोकजनशक्ती, या पक्षांच्या मते ३३% मध्येच अनु.जाती, जमाती, मागासवर्ग, अल्पसंख्यांकांना स्वतंत्र आरक्षण द्यावे तरच मागासवर्गीय महिलांना राजकारणात प्रतिनिधीत्व मिळेल आणि त्यांचा विकास होईल अन्यथा उच्च जातीच्या महिलांनाच या आरक्षणाचा लाभ मिळेल.
२. कॉंग्रेस, भाजपा आणि डाव्या पक्षांची भूमिका ही सध्याचे जे महिला आरक्षण विधेयक आहे ते पास करणे आवश्यक आहे.
३. कॉंग्रेसने राजकीय पक्षांनीच लोकसभेत आणि राज्यविधानसभेच्या निवडणुकीत जातीच्या संवर्गानुसार अनु-जाती, जमाती, ओ.बी.सी. च्या महिलांना उमेदवारी द्यावी, असे झाले तर सर्व जातींच्या महिलांना प्रतिनिधीत्व मिळेल. म्हणून हे विधेयक पास करणे गरजेचे आहे.
४. भाजपाच्या मते लोकसभा सदस्यांची संख्या वाढविण्यात यावी आणि मग ३३% महिलांना आरक्षण द्यावे. त्यामुळे पुरुषी प्रतिनिधीत्व कमी होणार नाही.

**लोकशाहीतील प्रतिनिधीत्वाची चर्चा :-**

भारत आणि सर्व विश्वामध्ये प्राचीन काळापासून आजपर्यंत स्त्रीयांना पुरूषांच्या तुलनेत सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात अत्याधिक दुय्यम स्थान मिळालेले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे पुरूषप्रधान संस्कृती असल्याने स्त्रीयांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. स्त्रीया ह्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत. संविधानात कलम १५ (४) १६ (४) ४६ नुसार सामाजिक मागासलेपणा आणि शैक्षणिक मागासलेपणाच्या निकषावर दुर्बल घटकांना सरकार प्रशासन, राजकारण आणि शिक्षणात पक्षपाती सुविधा देईल. अर्थात सामाजिक न्यायाद्वारे झुकते माफ दिले जाईल. त्यांना विकासाची संधी दिली जाईल. भारतीय समाजातील स्त्रीया ह्या सुध्दा दुर्बल घटकात शोषित आहेत. त्यांना मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थान दिलेले आहे. विशेषत: राजकीय क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधीत्व अत्यल्प आहे. म्हणून स्त्रीयांना सामाजिक मागासलेला, दुर्बल या निकषाच्या आधारे राजकरणात पुरेसे प्रतिनिधीत्व देण्यासाठी महिला आरक्षण विधेयक मांडण्यात आले. या विधेयकात महिलांना ३३% जागा आरक्षित देण्यात याव्यात असा उद्देश आहे. प्रतिनिधीत्व दावे आणि सामाजिक न्यायाची मागणी परस्पर पूरक आहे.

राजकीय ज्ञानात वाढ झाल्याने समाजातील जात, धर्म, स्त्री, पुरूष वर्ग, गट प्रतिनिधीत्वाची मागणी करतात.

१. स्वतंत्र राज्याच्या मागण्या.

Sadat Vyapari Education Society's Degloor College Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded



२. महिला आरक्षणाची मागणी.

३. आर्थिक निकषावर आधारित मराठा समाजाची मागणी.

४. नक्षलवाद्यांची मागणी.

५. प्रादेशिक प्रतिनिधीत्वाचा मुद्दा

६. पक्षपध्दतीत प्रतिनिधीत्वाचा मुद्दा.

## संदर्भसूची :-

१. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, २००३ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकरण, पिंपळापुरे अॅन्ड पब्लिशर्स नागपूर.

२. तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर, जाने. २०११ भारतीय राज्यघटना व घटनात्मक विकास, खंड (१) द युनिक अकॅडमी पुणे पेज २५०

३. डॉ. भास्कर भोळे, २०११ ऑगस्ट, भारतीय शासन आणि राजकरण, पिंपळापुरे ... नागपूर पेज २९५

४. सुहास पळशीकर, ऑक्टो- डिसेंबर २००३, उच्चवर्णीयासाठी आरक्षण, ... पत्रिका पेज, १८३

५. डॉ. कोनराव प्रल्हादराव पोले, महाराष्ट्रातील पंचायतराज आणि महिला आरक्षण, ... जाने. अरुणा प्रकाशन लातूर. पेज २२०.

६. प्रा.एम.बी. तीर पुणे विद्यापीठ वार्ता, महिला सबलीकरण आणि ... २००२ मार्च २००३, पुणे विद्यापीठ पुणे.

७. न्या चंद्रशेखर धर्माधिकारी, २२ जाने. २०००, संविधान ऐतिहासिक संदर्भ, ... पेज ७.९

८. न्या.बी.पी. मंडल, २२ जाने. २०००, संविधान सामाजिक न्याय आणि ... साधना साप्ताहिक.

९. सुप्रिया गायकवाड, १६ वी लोकसभा निवडणूक आणि महिलांचा सहभाग, ... निवडणूक विशेषांक २०१४, विचारशलाका, लातूर.

•••

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded